N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** पिंपरी-चिंचवड  **P.S.(ठाणे):** भोसरी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0788  **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/12/2025 06:10

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार  **Date From (दिनांक पासून):** 11/12/2025
   **Time Period (कालावधी):** पहर 5  **Date To ( दिनांक पर्यंत):** 11/12/2025
   **Time From (वेळेपासून):** 14:19 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:33 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 12/12/2025  **Time (वेळ):** 05:31 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 015

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/12/2025 05:31 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 7 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संर, संरक्षण विभाग फ झोन ,भोसरी कार्यालय भोसरी पुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** श्री.प्रविण नारायण निंबाळकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1987

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे,भोसरी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे,भोसरी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-9552574140

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री.गजानन अशोकराव देशमुख | | | 1. निर्माण हिल्स साईट फलट नं404,तळजाई पठार , धनकवडी पुणे,भोसरी,पिंपरी-चिंचवड,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | तडजोडीअंती रुपये 16,000/ | 16,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

16,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

गु.र.नं व कलम-788 /2025 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम 7
मी प्रविण नारायण निंबाळकर,वय-39 वर्षे व्यवसाय नोकरी,पद-पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे मो.नं.9552574140.
मी वरील प्रमाणे असुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे पोलीस निरीक्षक म्हणुन कार्यरत आहे. दि. 10.12.2025 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग ,पुणे येथे हजर असताना प्रशासन अधिकारी श्री.दयानंद गावडे, पोलीस उपअधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी तक्रारदार श्री.योगेश शामराव जाधव यांची लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून आपण सदर तक्रारदार यांची तक्रार ऐकुण घेवून त्याप्रमाणे पुढील कायदेशीर कारवाई करा असे सांगुन त्यासाठी पथक व शासकिय वाहन उपलब्ध करुन दिले तसेच महाराष्ट्र राज्य विदयुत वितरण कंपनी ,मर्या ,रास्ता पेठ पुणे येथील 1)श्री.विनायक बारकु शिंदे ,पद-कनिष्ठ कार्यालयीन सहायक 2)श्री.मंगेश सुरेश घोडे,पद- वरीष्ठ तंत्रज्ञ कॅम्प शाखा हे पंच उपलब्ध करुन दिले.दोन्ही पंच आमचे कक्षात हजर झाले नंतर त्यांना तेथे उपस्थित असलेले इसम श्री.योगेश शामराव जाधव यांची ओळख करुन दिली व घेतली.त्यानंतर आम्ही दोन्ही पंचाना तक्रारदार श्री.योगेश शामराव जाधव यांची लोकसेवकाविरुध्द लाच मागणी होत असलेबाबतची तक्रार असून त्यांची तक्रार नोंदवून त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करणेकामी आपण पंच साक्षीदार म्हणून उपस्थित राहून काम करणेस तयार आहात का? अशी विचारणा करता त्यास दोन्ही पंच साक्षीदार यांनी होकार दिला.त्याप्रमाणे पंच क्र.1 म्हणून श्री.विनायक बारकु शिंदे पंच क्र.2 म्हणून श्री.मंगेश सुरेश घोडे हे काम पाहतील असे सर्वानुमते ठरविण्यात आले. सदर वेळी तक्रारदार यांनी त्यांची तक्रार प्रथम तोंडी कथन करुन टंकलिखत तक्रार दिली की, तक्रारदार श्री.योगेश शामराव जाधव वय-25 वर्षे व्यवसाय-समाजकार्य ,रा.ठि.शांतीनगर वसाहत नं.02 भोसरी. ता. हवेली.जि.पुणे.मो.नं.9503492938.असे असुन ते अपंग असुन समाजकार्य करतात त्यांना शासकिय कागदपत्रांची माहिती असल्याने ते त्यांचे मित्र व ओळखीचे लोकांचे रेशनकार्ड काढुन देणेसाठी मदत करतात.त्यांचें मित्र व ओळखीचे असे चौदा जणांचे नवीन रेशनकार्ड काढणेसाठी त्यांनी तक्रारदार यांना अधिकारपत्र दिलेले आहे. त्यानुसार त्यांनी त्यांचे सर्व कागदपत्रे व शासकिय फी प्रत्येकी 50/- रुपये ही ऑनलाईन भरलेली आहे.त्या चौदा रेशनकार्डचे एन नंबर (ट्रॅकिंग नंबर )प्राप्त झाले असुन सदर चौदा नविन रेशन कार्ड मिळणेकरीता अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग "फ" झोन भोसरी चे पुरवठा निरीक्षक देशमुख साहेब यांना दि.08/12/2025 रोजी नमुद चौदा एन नंबरचे संदर्भात तक्रारदार यांनी विचारणा केली असता देशमुख साहेब यांनी प्रत्येक नवीन रेशनकार्ड साठी 900/- रुपये प्रमाणे चौदा रेशनकार्ड चे 12,600/-रुपये दयावे लागतील असे सांगितले. देशमुख साहेब यांनी प्रत्येक रेशनकार्डसाठी 900/- रुपये प्रमाणे मागितलेले 12,600/- रुपये हे शासकिय फी व्यतीरीक्त असुन त्यांनी मागितलेली रक्कम ही लाच रक्कम असुन ती देण्याची तक्रारदार यांची इच्छा नसल्याने देशमुख साहेब यांचेवर कारवाई व्हावी वगैरे मजकुराची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचेकडे तक्रार दिली सदरची तक्रार आम्ही व पंच साक्षीदार यांनी वाचून त्यावर सहया केल्या.त्यानंतर आम्ही पंचासमक्ष तक्रारदार श्री.जाधव यांना नमूद लोकसेवक पुरवठा अधिकारी गजानन देशमुख यांनी कधी व कुठे भेटण्यास बोलाविले आहे अशी विचारणा करता तक्रारदार यांनी उदया दि.11/12/2025 रोजी पुढील कारवाई करु त्याकरीता तुम्ही गुरुदेव दत्त सेवा मंदीर , लांडेवाडी भोसरी पुणे-39 येथे या असे सांगितलेने पुढील कारवाई दि.11/12/2025 रोजी करणेचे ठरलेआम्ही दि.10/12/2025 रोजी दिलेल्या सुचने प्रमाणे दि.11/12/2025 रोजी सकाळी 09.45 वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे येथे दोन्ही पंच व सापळा पथक हजर झाले. त्यानंतर 10.00 वा चे सुमारास शासकिय वाहनामधुन पडताळणी व सापळा कारवाईसाठी लागणारे साहीत्य घेऊन ला.प्र.वि कार्यालय पुणे येथुन निघुन गुरुदेव दत्त सेवा मंदीर ,लांडेवाडी भोसरी पुणे-39 येथे पोहोचलो ती वेळ 11.00 वा ची होती.सदर ठिकाणी तक्रारदार

जाधव उपस्थित होते.त्यानंतर तक्रारदार श्री.जाधव यांना अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग "फ" झोन भोसरी चे पुरवठा निरीक्षक देशमुख साहेब यांचेकडे लाच मागणी पडताळणी करीता पाठविण्याचे ठरलेने आमचेकडील शासकिय व्हॉईस रेकॉर्डर मध्ये पंचासमक्ष नवीन सिलबंद मेमरी कार्ड sandisk Ultra 32GB C10 A1 Micro Sd 1U HC I व त्याचे दुस-या बाजुस 5316DXKLH0FC BM MADE IN CHINA अशा वर्णनाचे टाकले व तक्रारदार श्री.योगेश जाधव यांचे पडताळणी कारवाईचे अनुशंगाने निवेदन घेऊन त्यापाठोपाठ पंच क्र. 1 व 2 यांचे निवेदन घेतली ती वेळ 11.43 वा.ची होती. सदर निवेदन घेतेवेळी नवीन मेमरी कार्ड त्याचे एका बाजुसsandisk Ultra 32GB C10 A1 Micro Sd 1U HC I C4 व 2033XV6628MC BM MADE IN CHINA मध्ये पंचासमक्ष व्हिडीओ चित्रीकरण करण्यात आले आहे.त्यानंतर पडताळणी कारवाईच्या अनुषंगाने तक्रारदार , दोन्ही पंच व सापळा पथकास योग्य त्या सुचना देण्यात आल्या त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर पुन्हा चालू करून तो आम्ही तक्रारदार श्री.जाधव यांनी परिधान केलेल्या टि शर्टचे आतील बाजुस सेफटी पिन च्या सहाय्याने चालु करुन लावुन दिला व तक्रारदार यांना पंच क्र.01 श्री.शिंदे यांचेसह पडताळणीकामी तक्रारदार यांचेकडील दुचाकी वरुन श्री.दत्त मंदीर लांडेवाडी ,भोसरी येथुन, लोकसेवक यांचे कार्यालय अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग फ झोन भोसरी येथे रवाना केले ती वेळ 12.02 वा ची होती.त्यानंतर थोडया वेळाने तक्रारदार व पंच हे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी परत आले त्यावेळी आम्ही तक्रारदार यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर काढुन बंद केला ती वेळ 13.01 वा ची होती. त्यावेळी आम्ही तक्रारदार यांना गेल्यापासुन येईपर्यंत काय झाले असे विचारले असता त्यांनी सांगितले की, "मी व पंच क्र.1 श्री.शिंदे असे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग फ झोन भोसरी येथे गेलो असता सदर ठिकाणी पुरवठा अधिकारी,गजानन देशमुख हे उपस्थित नव्हते. त्यावेळी तेथे उपस्थित असलेले कार्यालयातील इतर कर्मचारी यांना देशमुख साहेब कोठे आहेत या बाबत विचारणा करता देशमुख साहेब पोस्ट ऑफीस मध्ये गेलेचे समजले त्यामुळे मी व पंच थोडा वेळ तेथेच कार्यालयात थांबुन राहीलो.काही वेळाने देशमुख साहेब तेथे आले त्यावेळी मी व पंच असे देशमुख साहेब यांचे केबीन मध्ये गेलो त्यावेळी देशमुख साहेब यांनी मला रेशनिंग कार्ड संबंधात विचारणा केली व शिक्का मारुन घ्या स्टाफ कडुन असे म्हणाले. त्यानंतर पंचांना उद्देशुन ते कार्ड बाहेर जमा कर असे म्हणाले व त्यानंतर मला कितीयेत? असे विचारले असता मी 14 येत असे म्हणालो त्यानंतर देशमुख साहेब यांनी पंचाना शिक्के मारणेसाठी बाहेर जायला सांगितले.त्यावर पंच केबीनचे बाहेर जाऊन तेथुन संभाषण ऐकु लागले त्यानंतर मी देशमुख साहेब यांना किती झाले काय झाले चौदा च्याने असे विचारले असता देशमुख साहेब यांनी "चौदा गुणीले..... पंधरा द्या मंग" असे म्हणुन "सोळा हजार आठशे रुपये" असे म्हणाले. त्यावर मी साहेब ते आपले चार जणयत जरा, असे म्हणालो असता "ठिकय सोळा हजार आठशे होतील, तुला काय दयायचे ते दे" असे म्हणाले त्यावर मी त्यांना तरी किती? असे विचारले असता देशमुख साहेब यांनी, "हजाराने दया ते चार चे आणि दहा जणाचे पंधरा"असे म्हणाले त्यावर मी त्यांना पंधरा? असे विचारले असता त्यांनी, "हिशोब चुकलाय मायच्यान ..एकवीस होतायेत." असे म्हणाले, त्यानंतर , "दहा चे काय कर पंधरा दे,राहीलेल चार दे असे एकोणीस दे" असे म्हणाले असता मी एकोणीस हजार? असे विचारले असता त्यांनी "हां" असे म्हणुन 19,000/- रुपये मागितले त्यावर मी हयावेळेस वाढवले काय? असे विचारले असता देशमुख साहेब यांनी, "किती देत होते आपण"? असे विचारले त्यावर मी नऊशे ने देत होतो असे बोललो.त्यावर देशमुख साहेब यांनी "हेय" असे म्हणुन माझे बोलण झिडकारले त्यानंतर मी त्यांना नऊशे ने घ्या ओ सर असे बोललो असता देशमुख साहेब म्हणाले "बारा आठशेनी दे चल.. सोळा आठशे रुपये, दे पंधरा...सोळा हजार दे काय दयायचे ते दे.. राउंड फिगर कर चल".त्यावर मी त्यांना किती? असे विचारले असता त्यांनी, "अरे चौदा कार्ड होत, बाराशेन दे म्हणलं...तु तुझ ...सोळा हजार आठशेनीच पहिला हिशोब, बाराशेने केलता, बरोबर बाराशेन"े". असे म्हणले त्यावर मी त्यांना सोळा हजार? असे विचारले असता त्यांनी "हं" म्हणुन "सोळा दे चल" असे म्हणुन माझेकडे तडजोडीअंती 16000/- रुपये लाच मागणी केली.सदर वेळी माझे कडील 14 नवीन रेशन कार्डचे पेपर वर शिक्के मारुन दिले व त्यानंतर मी पंचासह आपण थांबलेल्या ठिकाणी परत आलो.त्यानंतर पंच क्र.01 शिंदे यांना गेलेपासुन येईपर्यंत काय झाले याबाबत विचारणा केली असता त्यांनी तक्रारदार योगेश जाधव यांचे प्रमाणे हकिकत सांगितली.त्यानंतर आम्ही व्हॉईस रेकॉर्डरमधील मधील ध्वनिमुद्रीत संभाषण फास्ट फॉरवर्ड करून ऐकले असता ते तक्रारदार व पंच क्र.1 यांनी सांगितलेली हकिकतप्रमाणे खरे असलेबाबतची खात्री केली.एकंदरीत तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीप्रमाणे ,अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग फ झोन भोसरी चे पुरवठा अधिकारी देशमुख, यांचेकडे तक्रारदार यांना व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन लाऊन देऊन पंचासह पाठवले असता सदर पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांना त्यांचे मित्र व ओळखीचे 14 लोकांचे नवीन रेशनकार्ड मंजुर करुन त्यावर सही शिक्का मारुन देणेसाठी लोकसेवक पुरवठा अधिकारी गजानन देशमुख यांनी तक्रारदार यांचेकडे सुरवातीस 14 कार्डपैकी 10 रेशन कार्ड करीता प्रत्येकी 1500/- रुपये प्रमाणे 15,000/- रुपये व उर्वरीत 04 रेशन कार्डसाठी प्रत्येकी 1000/- रुपये प्रमाणे 4000/-

रुपये असे 14 रेशन कार्ड साठी एकुण 19,000/- रुपयाची मागणी करून, त्यानंतर 14 रेशन कार्डसाठी प्रत्येकी 1200/- प्रमाणे एकुण 16800/- रुपये मागणी करुन तडजोडीअंती 16000/- रुपये लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले.सदर पडताळणी कारवाईचा सविस्तर पंचनामा करणेत आला आहे.त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांसमक्ष व तक्रारदार योगेश जाधव यांना लाच रक्कम हजर करणेस सांगितले असता तक्रारदार यांनी लाच रक्कम 16,000/- रुपये हजर केले.त्यानंतर पोहवा गदादे यांनी नमुद नोटांचे नंबर पंच क्र.02 घोडे यांचे मदतीने कागदावर लिहुन काढले त्यावर आम्ही व पंचांनी सहया केल्या.त्यानंतर तात्काळ सापळा कारवाई आयोजीत करण्याचे ठरवले. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांना सापळा कारवाई यशस्वी झाल्यास लोकसेवकाची "अंगझडती व लाचेची रक्कम"जप्त करण्याच्या कारवाईचे चित्रीकरण करण्यात येणार असल्याचे सांगितले.त्यानंतर आम्ही शासकिय वाहना मध्ये दोन्ही पंचांना व तक्रारदार जाधव यांना अन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म समजावून सांगून त्याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. त्यानंतर आम्ही लाचेकामी वापरावयाची रक्कम रूपये 16,000/- (रूपये 500/- दराच्या 32 चलनी नोटा) ही चालक ग्रेड पोलीस फौजदार जाधव यांना अॅन्थ्रासीन पावडर लावण्याकरीता दिल्या असता, ग्रेड पोलीस फौजदार जाधव यांनी कापसाच्या बोळयाने प्रत्येक चलनी नोटांच्या दोन्ही बाजूस अॅन्थ्रासीन पावडर लावली.त्यानंतर चालक ग्रेड पोलीस फौजदार जाधव यांनी सदर लाचेची रक्कम तक्रारदार योगेश जाधव यांच्या नेसणीस असलेल्या निळया रंगाच्या फुल नाईट पॅन्टच्या पुढील उजव्या खिशात ठेवली. त्यानंतर सापळा कारवाईचे अनुषंगाने आम्ही पंचासमक्ष डिजीटल व्हाईस रेकॉर्डर चालू करून व मपोहवा गोरे यांनी मोबाईल मधील कॅमेरामधील व्हिडीओ रेकॉर्डर चालु करुन त्यामध्ये तक्रारदार जाधव त्यानंतर दोन्ही पंचांचे सापळा निवेदन घेतले ती वेळ 13.35 वा होती. त्यानंतर गजानन देशमुख पुरवठा अधिकारी ,अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग फ झोन भोसरी यांनी मागणी केलेली लाच रक्कम देणेकरीता तक्रारदार यांना शासकिय व्हॉईस रेकॉर्डर चालू करुन त्यांनी परीधान केलेल्या टि शर्ट चे आतील बनयिन ला सेफटी पीनच्या सहाय्याने लावुन देऊन शासकिय पंच क्र.1 श्री.शिंदे यांचेसह तक्रारदार यांचेकडील दुचाकी वाहन अक्टिवा वरुन ,अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग फ झोन भोसरी येथे जाणेसाठी 13.54 वा. चे सुमारास श्री दत्त मंदीर ,लांडेवाडी भोसरी येथुन रवाना केले व त्यांचे पाठोपाठ सापळा पथक रवाना झाले व अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग फ झोन भोसरी कार्यालयाच्या काही अंतरावर शासकिय वाहन कोणास संशय येणार नाही अशा प्रकारे थांबवले व पंच क्र.02 व सापळा पथक चालत तक्रारदार यांचे पाठोपाठ निघालो व ,अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग फ झोन भोसरी कार्यालयाच्या आवारात सापळा पथक कोणासही संशय येणार नाही अशा रितीने परिसरात थांबून होतो.तक्रारदार व पंच क्र.01 हे लोकसेवक यांचे कार्यालयात गेले थोडया वेळाने तक्रारदार यांनी आमचे मोबाईल वर मिस कॉल देऊन लाच रक्कम स्विकारलेबाबत पुर्व नियोजीत इशारा केला त्यानंतर आम्ही,पंच क्र.02 व पथक ,अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग फ़ झोन भोसरी कार्यालयाच्या ठिकाणी गेलो आम्ही दिलेल्या सुचनेनुसार मपोहवा गोरे यांनी तात्काळ शासकिय कॅमेरामध्ये चित्रीकरणास सुरुवात केली.त्यानंतर आम्ही तक्रारदार जाधव यांना लावण्यात आलेला डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून बंद केला ती वेळ 14.19 वा.ची होती.त्यावेळी पंच क्रमांक 1 श्री.शिंदे यांनी अंगुली निर्देश करुन हेच लोकसेवक गजानन देशमुख असल्याचे सांगितले.त्यावेळी लोकसेवक गजानन देशमुख यांचे दोन्ही हात पोहवा गदादे यांनी पकडले व आम्ही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी असल्याचे सांगून त्यांना हालचाल करण्यास मनाई केली.त्यानंतर आम्ही ओळखपत्र दाखवून स्वत:ची व सापळा पथकाची ओळख सांगितली. त्यानंतर तक्रारदार व पंच क्र.01 यांना लोकसेवक गजानन देशमुख यांनी स्विकारलेली लाच रक्कम कुठे ठेवली आहे असे विचारले असता तक्रारदार यांनी लोकसेवक गजानन देशमुख यांनी लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन उजव्या हातात घेऊन त्यांनी परीधान केलेल्या गडद निळया रंगाच्या पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशामध्ये ठेवली असल्याचे सांगितले.त्यानंतर आम्ही लोकसेवक यांना लाच रकमेबाबत विचारणा केली असता त्यांनी सदरची लाच रक्कम त्यांनी परीधान केलेल्या गडद निळया रंगाच्या पॅन्टच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशामध्ये असल्याचे सांगितले.त्यानंतर पंचासमक्ष लोकसेवक गजानन देशमुख यांनी लाच रक्कम त्यांचे नेसत्या पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या बाजुच्या खिशातुन काढली असता लगेचच पोहवा गदादे यांनी लोकसेवक गजानन देशमुख यांचे अनुक्रमे डावा व उजवा हात मनगटाजवळ पकडून त्यांचे दोन्ही हात व कपडयाचा कोठेही स्पर्श होणार नाही याची दक्षता घेतली.त्यावेळी पंच क्र.02 श्री.घोडे यांनी लाचेची रक्कम ताब्यात घेवून मोजली असता ती रुपये 16,000/- असल्याचे दिसून आले.त्यानंतर सदर नोटांचे सापळापुर्व कारवाई दरम्यान कागदावर लिहून ठेवलेल्या नोटांच्या नंबरशी खात्री केली असता ते तंतोतंत जुळून आले.त्यानंतर लोकसेवक यांच्या ताब्यात घेतलेली लाच रक्कम अल्ट्राव्हायलेट दिव्याच्या प्रकाशात पाहिली असता त्यावर फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.त्यानंतर लोकसेवक गजानन देशमुख यांची तपासणी केली असता त्यांचे उजव्या हाताला व पॅन्टचे पुढील बाजुचे उजव्या खिशाला अॅन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगांची चकाकी दिसून आली. तसेच तक्रारदार जाधव यांच्या

हाताची व कपडयंाची तपासणी केली असता,जाधव यांच्या दोन्ही हाताच्या बोटांच्या वरील भागास अॅन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली. तसेच पॅन्टच्या पुढील बाजूच्या उजव्या खिशाचे तोडांवर व आतील बाजुस अॅन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.त्यानंतर पंच क्र.02 यांचे हाताची तपासणी केली असता त्यांचे उजव्या हातास अॅन्थ्रॉसीन पावडरची फिक्कट निळसर रंगाची चकाकी दिसून आली.त्यानंतर लोकसेवकास त्याचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव. श्री.गजानन अशोकराव देशमुख वय 36 वर्षे , व्यवसाय ः- नोकरी पद- परिमंडळ अधिकारी ,अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग "फ" झोन भोसरी ,पुणे रा.निर्माण हिल्स साईट फलॅट नं.404 तळजाई पठार ,धनकवडी पुणे.असे सांगितले.त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री.जाधव यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता त्यांनी पंचासमक्ष सांगितले की, मी पंच क्र.1 शिंदे यांचेसह ,अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग "फ" झोन भोसरी ,पुणे येथे गजानन देशमुख यांचे कार्यालयात पोहोचलो सदर वेळी लोकसेवक देशमुख साहेब जेवण करत होते मी थोडा वेळाने त्यंाची भेट घेतली असता देशमुख साहेब मला "आला कशाला योगेश.. येथून गेलता ना... एकदा,आता आला तर पैसे कोण देणार? अशी विचारणा करुन माझेकडे पैशाची मागणी केली असता, "मी देणार ..सोळा हजार असे म्हणुन मी माझे नेसत्या पँटच्या उजव्या खिशामध्ये असलेली 16,000/- रुपये लाच रक्कम माझ्या उजव्या हाताने काढुन त्यांचे समोर धरली असता लोकसेवक गजानन देशमुख यांनी लाच रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारुन त्यांनी परीधान केलेल्या गडद निळया रंगाच्या पँटच्या पुढील बाजुच्या उजव्या खिशामध्ये ठेवली व त्यानंतर मी पुर्व नियोजित इशारा केला.त्यानंतर पंच क्र.1 श्री.शिंदे यांना सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता त्यांनी ही तक्रारदार यांचे प्रमाणे हकिकत सांगितली.सदर बाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे तरी दि.10.12.2025 रोजी तक्रारदार यांनी केलेल्या तक्रारीप्रमाणे ,अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग फ झोन भोसरी चे देशमुख साहेब यांचेकडे आज दि.11/12/2025 रोजी पडताळणी कामी तक्रारदार यांच्या टि शर्टच्या आतील बाजुस बनियनला डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन लाऊन देऊन पंचासह पाठवले असता सदर पडताळणी कारवाई दरम्यान तक्रारदार यांना त्यांचे मित्र व ओळखीचे 14 लोकांचे नवीन रेशनकार्ड मंजुर करुन त्यावर सही शिक्का मारुन देणेसाठी लोकसेवक गजानन देशमुख यांनी तक्रारदार यांचेकडे सुरवातीस 14 कार्डपैकी 10 रेशन कार्ड करीता प्रत्येकी 1500/- रुपये प्रमाणे 15000/- रुपये व उर्वरीत 04 रेशन कार्डसाठी प्रत्येकी 1000/- रुपये प्रमाणे 4000/- रुपये असे 14 रेशन कार्ड साठी एकुण 19,000/- रुपयाची मागणी करून त्यानंतर 14 रेशन कार्डसाठी प्रत्येकी 1200/- प्रमाणे एकुण 16800/- रुपये मागणी करुन तडजोडीअंती 16000/- रुपये लाच मागणी करुन दि.11.12.2025 रोजी ,अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग फ झोन भोसरी येथे परिमंडळ अधिकारी गजानन देशमुख यांनी पंचासमक्ष 16,000/- रुपये लाच रक्कम तक्रारदार योगेश जाधव यांचेकडुन स्विकारली म्हणुन माझी श्री.गजानन अशोकराव देशमुख वय 36 वर्षे ,व्यवसाय- नोकरी पद- परिमंडळ अधिकारी ,अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग "फ" झोन भोसरी ,पुणे रा.निर्माण हिल्स साईट फलॅट नं.404 तळजाई पठार ,धनकवडी पुणे. यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.माझा वरील फिर्यादी जबाब माझे सांगणे प्रमाणे टंकलिखीत करण्यात आला असून तो मी वाचून पाहीला असून बरोबर आहे.

तपासी अधिकारी-आसावरी शेडगे, पोलीस निरीक्षक, ला प्र वि पुणे.मो.नं.8425808058.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

Sandip Bhaurao Ghorpade (I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)
**Name** (नाव): Sandip Bhaurao Gh
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

ठाणे अंमलदार
भोसरी पोलीस स्टेशन
पिंपरी चिंचवड शहर

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**